# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

**दिनांक २८.११.२००५ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

सोमवार दिनांक २८ नोव्हेबंर २००५ रोजी मा.महापौर श्री.किशनचंद लेखराज तनवाणी यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह'' येथे सकाळी ११.०० वाजता ''वंदेमातरम्'' या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.काशिनाथ कोकाटे
०३. स.स.श्री.संजय शिरसाट
०४. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०५. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०६. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०७. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०८. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
११. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१२. स.स.श्री.पाटील अलका रमेश
१३. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१४. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१५. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१६. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१७. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१८. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१९. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२०. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२१. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२२. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२३. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२४. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२५. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२६. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
२७. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्यीन
२८. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
२९. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३०. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३१. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३२. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
३३. स.स.श्री.खान निसार मो.खान

३४. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
३५. स.स.सौ.खान आबेदा बेगम गुलाब खान
३६. स.स.सौ.राऊत छाया विलास
३७. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
३८. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
३९. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४०. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४१. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
४२. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४३. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४४. स.स.श्री.मोतीवाला अशरफ म.युनुस
४५. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
४६. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४७. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४८. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
४९. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५०. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५१. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५२. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५३. स.स.श्री.खुडे विजय किसन
५४. स.स.श्री.खेंडके संतोष सर्जेराव
५५. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
५६. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
५७. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
५८. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
५९. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६०. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६१. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६२. स.स.सौ.संगिता विठ्ठलराव जाधव
६३. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
६४. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६५. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
६६. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
६७. स.स.श्री.जोशी संजय रामदास
६८. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
६९. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७०. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७१. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७२. स.स.सौ.जैन अल्पा विकास
७३. स.स.श्री.बारवाल गजानन
७४. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
७५. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०३. स.स.श्री.राजेश व्यास
०४. स.स.श्री.सुरेंद्रसिंग सबरवाल

**विषय क्र. १२३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक १६/११/२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र.१०७ अन्वये सन २००५-२००६ साठी मनपाने जकात वसुलीचे उद्यीष्ट रूपये ८३ कोटी एवढे निश्चित केलेले असून खाजगी अभिकर्ता नेमूण जकात वसुली केल्यास स्पर्धात्मक दर प्राप्त होवून उद्यीष्टापेक्षा जास्त रक्कम मनपास प्राप्त होवू शकते. जकात कराची वसुली खाजगी अभिकर्त्यामार्फत करण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे. या संदर्भाने प्रशासनाकडून सादर करण्यात आलेल्या जकात दराचे सुसूत्रिकरणाचे (Rationalization) प्रस्तावास सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अ.क्र.१, ३, ४, १३, १४, १५, २०, २१, ५१, ५२, ५३, ५४ व ६१ यात सुचविलेल्या बदलास सर्वानुमते मंजुरी देण्यात येऊन जकात दराचे सुसूत्रिकरण (Rationalization) करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यास शिफारस केली आहे. प्रशासनाकडून सादर करण्यात आलेला मुळ प्रस्ताव खालील प्रमाणे.

जकात हा महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत आहे. सद्यस्थितीत शहरात आयात होणाऱ्या मालावरील जकात कराची वसुली मनपा अस्थापनेवर कार्यरत विविध संगर्वातील कर्मचाऱ्यांकडून करण्यात येते. तथापी मनपाने ठरविलेल्या उद्यीष्टापेक्षा जास्त रक्कम मनपास जकात खाजगीकरणाच्या माध्यमातून प्राप्त होवू शकते. यापूर्वी सन २०००, २००१, २००२ व २००३ या वर्षामध्ये जकात खाजगीकरणासंदर्भाने निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. तथापी एकानेक कारणांमुळे जकात खाजगीकरण होवू शकले नाही.

दिनांक २५/१०/२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती बैठकीत चर्चा होवून जकात खाजगीरणाबाबतचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे. सन २००५-२००६ साठी मनपाने जकात वसुलीचे उद्यीष्ट रूपये ८३ कोटी एवढे निश्चित केलेले असून खाजगी अभिकर्ता नेमूण जकात वसुली केल्यास स्पर्धात्मक दर प्राप्त होवून उद्यीष्टापेक्षा जास्त रक्कम मनपास प्राप्त होवू शकते. या संदर्भाने खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१) औद्योगिक वसाहतींना चालना मिळण्यासाठी औद्योगिक कारखान्यांना लागणाऱ्या कच्या मलाचे दर कमी केल्याने सदरील कारखाने शहरा बाहेर शक्यतो जाणार नाहीत आणि शहराबाहेर स्थलांतरीत उद्योग पुन्हा नव्याने शहरात स्थलांतरीत होतील अशी अपेक्षा आहे.

२) शहरातील व्यापार मनपा हद्यीबाहेर स्थलांतरीत होवू नये या करीता विद्युत, विद्युत साहित्य, शेती विषयक अवजारे, मुद्रण यंत्रे, मशनरी, मशनरी पार्ट,संगणक, संगणक साहित्य, बी-बियाणे, किटकनाशके, जंतु नाशके कपडा, कोळसा इत्यादी वस्तुंचे दर कमी करण्यात आलेले आहे.

३) सोलार उद्योजकांना चालना मिळण्यासाठी सोलार वॉटर हिटर व त्यासंबंधीचे सुटे भाग या वस्तुंना जकात करातुन सुट देण्यात आलेली आहे.

४) शालेय पुस्तके, महाविद्यालयीन शैक्षणिक पुस्तके व कायद्याची पुस्तके यांना सुध्दा शासन निर्णयानूसार जकात करातून सुट देण्यात आली आहे.

५) जकात वसुलीच्या खाजगीकरणाचे उद्यीष्ट ९९.२७ कोटी रूपये एवढे राहील.

जकातीचे खाजगीकरण करण्यापूर्वी जकात दराचे सुसुत्रीकरण करणे आवश्यक असून Rationalization केल्यास जकात वसुलीत काही प्रमाणात घट निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापी या प्रक्रियेमुळे नजीकच्या काळात शहराच्या हद्दी बाहेर असलेले विविध व्यावसायीक गोडावून्स शहरात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी जकात कर उत्पन्नात भरीव वाढ झालेली असेल. तसेच Rationalization मुळे जकात चोरीची शक्यता पण कमी होईल अशी अपेक्षा आहे.

जकात दरात सुधारणा करत असतांना सोबत सलग्न करण्यात आलेल्या Octroi Schedule "O" (Revised) बाबतचा तक्यात दर्शविल्या प्रमाणे कायदेशीर कार्यवाही पूर्ण करून जकात कराची वसुली खाजगी अभिकर्त्यामार्फत करणे करीता निविदा प्रसिध्द करणे योग्य होईल. करीता जकात दराचे Rationalization करणे व खाजगी अभिकर्त्या मार्फत जकात कराची वसुली करणे बाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मुजीब आलम शहा : सदर प्रस्ताव स्थायी समितीमध्ये आलेला होता. या प्रस्तावावर प्रशासनाने खुलासेवार उत्तर दिलेले नाही. स्थायी समितीने जकात खाजगीकरणाचा ठराव पारीत केलेला आहे. सदर प्रस्ताव कायम करण्यासाठी स्थायी समितीसमोर आलेला असतांना जकात दराचे सुसूत्रीकरणाचा प्रस्ताव प्रशासनामार्फत आलेला आहे. सदर प्रस्ताव महानगरपालिकेच्या आर्थिक घट होण्यासाठी आलेला आहे. यासंदर्भात प्रशासनाच्या भावना काय आहेत. केमीकल्स् व इतर जकात दर कमी करण्यात आले. भाजीपाला, विटा, बांधकाम साहित्य, इत्यादीवर ३०-४०% वाढविण्यात आलेले आहे. केमीकल्स् मध्ये महानगरपालिकेला कोट्यावधीचे नुकसान होणार आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : जकात खाजगीकरण हा एक विषय झाला व जकात दराचे सुसूत्रीकरण हा दुसरा विषय आहे. खाजगीकरण करायचे किंवा नाही हा पहिला प्रश्न आहे व कोणते दर ठेवायचे हा दुसरा प्रश्न आहे.

श्री.संजय शिरसाठ : जकात खाजगीकरणाचा विषय नाही. जकात दर सुसूत्रीकरणाचा हा विषय असुन जकात खाजगीकरण हे यापुर्वीच मंजुर झालेले आहे. त्यानुसारच याविषयी चर्चा करून मंजुर करावा.

मा.महापौर : जकात खाजगीकरणाचा दोन वेळेस निर्णय झालेला आहे. निविदा काढण्यात आलेली होती. यासंदर्भात प्रशासनाला आदेश दिलेले होते. आता हा प्रस्ताव जकात दर सुसूत्रीकरणासाठी आलेला आहे. खाजगीकरणाचा प्रस्ताव मंजुर झालेला आहे.

श्री.अ.रशिद खान मामु : सर्वसाधारण सभेचा ठराव तीन महिन्यानंतर बदलता येतो. तो अधिकार सर्वसाधारण सभेला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७० अन्वये सर्वसाधारण सभेला स्थायी समितीकडून माहिती मागविता येते. खाजगीकरण करायचे किंवा नाही त्यात व्यापाऱ्यांचे नुकसान होईल व करायचे असेल तर कसे करायचे ? जकात दर वाढवावयाचे किंवा कमी करायचे ?

श्री.संजय जगताप : ठाणे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील जकात खाजगीकरण व इतर महानगरपालिकेतील खाजगीकरण तोट्यात चालले आहे.

श्री.मुजीब आलम शहा : स्थायी समितीकडून आलेल्या मंजुरी प्रस्तावानुसार जकातीच्या अनेक मालावर जकात आकारला जात नव्हता त्यामूळे सदरील प्रस्ताव आणल्याचे दिसून येते.

श्री.अ.रशिद खान मामु : कलम ७० प्रमाणे सर्वसाधारण सभेपुढे आणू शकतो. विरोध झालेला असला तरी दर वाढविलेले आहे. आता सर्वसाधारण सभेपुढे निर्णय घेता येतो.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : १९९९ ला सर्वसाधारण सभेने ठराव पारीत केलेला असुन या प्रस्तावावर प्रशासनामार्फत कार्यवाही झाली किंवा नाही ? जकात खाजगीकरण करणे चांगले आहे. यापुर्वी सर्वसाधारण सभेने अनेक ठराव घेतलेले असतील, त्यावर प्रशासनाने काय कार्यवाही केली, कार्यवाही करणे प्रशासनावर बंधनकारक नाही का ?

मा.महापौर : १९९९ च्या ठरावानुसार पुर्वी कार्यवाही झाली होती. महानगरपालिकेस शासनाचे कोणत्याही प्रकारचे अनुदान प्राप्त होत नसल्याने महानगरपालिकेचा विकास कार्यात

अडथळे होत आहेत. यासाठी मा.आयुक्त यांनी व्यापारी महासंघाशी चर्चा करूनच सदरील प्रस्तावाबाबत १९९९ मध्ये कार्यवाही झाली होती व आता सुसूत्रीकरण करण्याबाबत प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवलेला आहे. याबाबत शहरातील व्यापार चांगला रहावा. त्यादृष्टीने जकात दर सुसूत्रीकरणाचा प्रस्ताव आलेला आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : सभागृहात स.सदस्यांनी खाजगीकरणासंबंधी मत मांडलेले आहे. सर्व साधारण जनतेला पैसा उपलब्ध होत असेल, महाराष्ट्र शासन ते महानगरपालिका पर्यंत अशीच परिस्थिती चालू आहे. सभागृहात यावर वेगवेगळे मत मांडण्यात आलेले आहे. सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत मागणी होत आहे. मात्र मालमत्ता कर, जकात दर, पाणीपट्टी वाढवायची नाही, हे एका बाजुला व दुसरीकडे गुंठेवारी अंतर्गत येणारे सुमारे पाच लाख जनता पाण्यावाचुन रहाते. यासाठी तरतुद कोठुन आणणार ? शासनाकडून कोणतेही अनुदान मिळालेले नाही. स्थायी समिती अंतर्गत निर्णय घेण्यात येवुन स्थायी समितीने एकमुखाने मान्यता दिलेली आहे. ९८% लोकांचे हित सांभाळून यातुन ५० कोटीची तरतुद होणार आहे. त्याच प्रमाणे २०० कर्मचारी उपलब्ध होणार आहे. शहरातील ४० हजार मालमत्तांना अद्याप पर्यंत मालमत्ताकर लावलेला नव्हता. स्पेक इंडिया लि. मार्फत सर्वे करून या मिळकतींना मालमत्ता कर आकारणी करण्यात येत आहे. खाजगीकरणाचा प्रस्ताव स्थायी समितीने मान्य केलेला असुन जकात दर सुसूत्रीकरणाचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे पाठविण्यात आलेला आहे.

याचवेळी जकात खाजगीकरणास विरोध म्हणून आघाडीचे स.सदस्य आवाज करतात.

श्री.संजय जगताप : सदर ठराव रद्द करण्यात यावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : खाजगीकरण बाबत निर्णय १९९९ ला झालेला आहे. मग आतापर्यंत उशीर का झाला, पुढील कार्यवाही करावी. व खाजगीकरणाला आपण समर्थन का करीत आहोत.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : जकात दर सुसूत्रीकरण करावयाचा प्रस्ताव आहे की, खाजगीकरणाचा याचा स्पष्ट बोध होत नाही. ९९.२७ कोटी वाढ होईल हे म्हणणे योग्य नाही, त्यासाठी समिती गठीत करावी.

मा.महापौर : मूळ प्रस्ताव सभागृहासमोर वाचून दाखवावा.

नगर सचिव : प्रस्ताव वाचून दाखवितात.

श्रीमती अलका पाटील : स्थायी समितीने सदर प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे. आपणांसही मंजुर करावयाचा किंवा नाही हे ठरवावे लागेल. माझा खाजगीकरणास विरोध आहे.

श्री.मुजीब आलम शहा : दोन्ही विषय वेगवेगळे आहेत. एक विषय स्थायी समितीकडे आला व दुसरा विषय सर्वसाधारण सभेपुढे सादर झालेला आहे. सन २००२-०३, २००३-०४, २००४-०५ मध्ये किती जकात वसुली झाली.

श्री.सलिम पटेल : जकातीचे उद्दीष्ट किती आहे व वसुली किती आहे ? जकात सुसूत्रीकरण प्रस्ताव चुकीचा आहे. २००२ मध्ये निविदा काढण्यात आली होती त्याचे काय झाले.

श्री.मुजीब आलम शहा : यामध्ये आपणांस किती नफा होणार आहे व किती नुकसान होणार आहे ? केमीकल मुळे किती कमी होईल ?

उपआयुक्त (म) : २००४-०५ च्या अर्थसंकल्पामध्ये ७६ कोटी एवढे जकातीचे उद्दीष्ट ठेवले होते. सुधारीत अर्थसंकल्प २००४-०५ मध्ये ७१.५० कोटीचे उद्दीष्ट ठेवण्यात आलेले होते. त्यात ९९% वसुली झाली. २००५-०६ च्या अर्थसंकल्पात ८३ कोटी उद्दीष्ट ठेवलेले आहे. २७ नोव्हेंबर २००५ पर्यंत ५४.८० कोटी आवश्यक आहे. प्रत्यक्षात ५०.२७ कोटी वसुली झाली. याचे उद्दीष्ट ९२% साध्य झाले आहे.

प्रशासनातर्फे ८० कोटी उद्दीष्ट प्रस्तावित करण्यात आले होते, त्यास स्थायी समितीने ८१ कोटी व सर्वसाधारण सभेने ८३ कोटी बदल सुचवून उद्दीष्ट ठेवलेले आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : मुळ उद्दीष्टावर किती टक्के व सुधारीत किती टक्के वसुली झाली याबद्दल माहिती द्यावी.

उपआयुक्त (म) : २००४-०५ च्या सुधारीत उद्दीष्टावर ९९% व मुळ उद्दीष्टावर ९३.४८% इतकी वसुली आहे.

श्री.संजय जोशी : मुळ उद्दीष्टावर ९३% व सुधारीत उद्दीष्टावर ९९% वसुली आहे तर खाजगीकरण कशासाठी ? किती वाढविणार ? ७६ कोटीच्या ९३% होते ७१.५ कोटीच्या ९९% म्हणजे व्यवस्थित वसुली होते, मग कामासाठी पैसे कसे कमी पडतात. व अर्थसंकल्प तुटीचा का मांडल्या जातो, याबाबतची माहिती द्यावी.

श्री.मुजीब आलम शहा : सन २००२ ते २००३ पर्यंतचे जकात वसूलीचे आकाडेवारीसह माहिती द्यावी.

मा.आयुक्त : मुळ अर्थसंकल्पातील उद्दीष्ट ७६ कोटी व सुधारीत ७१ कोटी अर्थसंकल्पात कमी करून त्यांचे ९९% मागच्या वर्षी वसुली झालेली आहे. जकात दराचे सुसूत्रीकरण व खाजगीकरणास स्थायी समितीने मान्यता दिली असुन सुमारे एक महिन्यात खाजगीकरणाची कार्यवाही पुर्ण होईल. महानगरपालिकेला आर्थिक फायदा होईल. खाजगीकरणाला अडचण नाही. जास्तीत जास्त १२ महिने निविदाचा कालावधी राहील. फक्त जकात दराचे सुसूत्रीकरण करता येणार नाही म्हणुन जकात दराचे सुसूत्रीकरण करून खाजगीकरण करावे असा प्रस्ताव आहे. यासाठी सुसूत्रीकरण करणे आवश्यक असल्याने बदल केलेले नाही. अशीच वसुली केली तर पुढे नुकसान होणार, उद्योग बाहेर जातील. जकात दराचे सुसूत्रीकरण झाल्यानंतर जे प्रामाणिकपणे जकात भरतील त्यांना खाजगीकरणाचा परिणाम होणार नाही व जे जकात चुकविण्यासाठी प्रयत्न करतील त्यांचेकडून खाजगी अभिकर्ते वसुल करतील. जकातीचे दर हे वजनावर न घेता किंमतीवर आकारणे योग्य आहे. बासमती तांदुळावर रू.३/- प्रती क्विंटल व साध्या तांदुळावर रू.३/- प्रती क्विंटल देणार त्यामुळे किंमती वर आकारल्यास वस्तुच्या मुल्याच्या प्रमाणात जकात वसुल करता येईल. एकाच प्रतीच्या वस्तुवर सारखे दर आकारता येतील. वजनावर जकात नको किमंतीवर असावे. दोन टक्के, बांधकाम साहित्यावर तीन ते चार टक्के, दारूवर सात टक्के असावे. इनपुट कमी व आऊटपुट जास्त रेट असावेत. सुसूत्रीकरण व खाजगीकरणामुळे जकात भरणाऱ्यांना दिलासा मिळेल व चोरीला आळा बसेल. जकात दराचे सुसूत्रीकरण केल्याने सहा टक्के नुकसान होईल परंतु खाजगीकरणामुळे हे भरून काढता येते. प्रस्तावित केल्यानुसार मुळ दर ९९.२७ कोटी ठेवावे लागेल. स्थायी समितीने मान्य केल्याप्रमाणे ते मान्य झाल्यास ते ९५ कोटीच्या जवळपास ठेवावे लागेल. जकात दर सुसूत्रीकरणाला मान्यता द्यावी. शहरात उद्योग थांबतील, नविन उद्योगधंदे येतील. महानगरपालिकेस आर्थिक फायदा होईल. जकात सुसूत्रीकरण व खाजगीकरणाचा पॅकेज मंजुर करावा ही विनंती आहे. सुसूत्रीकरणामूळे जे भरणारे आहेत, त्यांना दिलासा व जे भरणारे नाहीत त्यांना आळा बसेल.

श्री.मुजीब आलम शहा : ५ कोटीचे नुकसान मान्य केले जाते. केमीकल व उद्योगावरील दर कमी खाजगी अभिकर्ता आपले उद्दीष्ट कसे पुर्ण करेल. कोणत्या वस्तुवर वाढायचे कोणत्या वस्तुवर कमी करायचे यामुळे ५ ते १० कोटी पर्यंत आकडा जाईल. असे वाटते.

श्री.संजय जोशी : मा.आयुक्तांनी इनपुट व आऊटपुटची माहिती दिली. भाजी एक रूपया प्रती क्विंटल ऐवजी ०.५ % भाजीचा भाव १५ रू. किलो झाला तर एका क्विंटलवर साडेसात रू. होईल. हिरे मोती यांचे दर कमी प्रस्तावित केले परंतु हिरेमोती सामान्य जनता वापरत नाही, सामान्य माणसाला तर बघायलाही मिळत नाही. ते ३ % चे १.५ %वर आणले. बांबूचे रेट वाढविले. केनफर्निचरचे रेट कमी केले. योग्य खुलासा करण्यात यावा. संगणकाचे रेट कमी करून संगणक येणार नाही. भाजीवाले बाहेर भाजी विकतील. भद्रामारूतीला जावुन लोक भाजी आणतील. अर्थसंकल्प तयार करतांना गरीबातील गरीब माणूस समोर ठेवुन तयार केला जातो. श्रीमंत माणूस श्रीमंत ठेवत नाही. विशिष्ट वर्गासाठी वाढ केली आहे. फायबर केमीकलचे रेट कमी प्रस्तावित केले. उद्योगासाठी पाणी व विद्युत हा महत्वाचा मुद्दा आहे. यावर एकवेळ पुन्हा विचार करण्यात यावा. तांदुळावर ०.५% केले त्यामुळे प्रती क्विंटलवर एक रूपया जकात आकारणी ऐवजी सव्वाचार रूपये वाढ होईल. रॉकेलचे एक लिटर मागे वीस पैसे वाढणार. सुसूत्रीकरणाच्या नावाखाली अन्याय होईल. जकात दरवाढ करू नये.

श्री.अ.रशिद खान मामु : सदर प्रस्ताव प्रशासनाने स्थायी समितीला ठेवलेला आहे आणि स्थायी समितीने मान्यता देवुन सर्वसाधारण सभेला शिफारस केलेली आहे त्यामुळे प्रशासनाऐवजी स्थायी समितीचा उल्लेख करण्यात यावा.

मा.उपमहापौर : सदर प्रस्तावावर वेगवेगळे मतमतांतर होत असून त्यानुसार चर्चा होत आहे. विषय कोणती पाठविला, सभागृहात कोणत्या विषयावर बोलावचे जकात दर सुसूत्रीकरणाचे अधिकार स्थायी समितीला आहे का ? सदर प्रस्ताव स्थायी समितीला कोणत्या नियमाने पाठविले असा प्रस्ताव पाठविता येतो का ? याबाबत प्रथम माहिती होणे आवश्यक आहे.

मा.आयुक्त : जकात दराचे सुसूत्रीकरण व खाजगीकरण हा एकत्रित प्रस्ताव आहे. हा प्रस्ताव एकत्रित असल्याने स्थायी समितीमार्फत पाठविण्यात आलेला आहे. पॅकेज म्हणुन पाठवले.

श्री.संजय जोशी : तिन्ही गोष्टी एकत्र करून पॅकेज करून पाठविलेले आहे.

मा.आयुक्त : जकात सुसूत्रीकरण करित असतांना काहिंची दरवाढ तर काहिंना नाही. तेंव्हा रॉकेलला काही हरकत नाही तीन पैसे प्रती लिटर पडते. धान्यावर वाढ केलेली आहे. आपण गहू, तांदुळ खातो. थाळीत वेगवेगळे पदार्थ असतात. वेगवेगळ्या दराने तेवढीच जकात येणार आहे. वजनाने न घेता दराप्रमाणे घेणे योग्य ठरेल. बासमती व साधा तांदुळ यांना दराप्रमाणे जास्त व कमी आकारणी होते. उद्योग बाहेर जातात ते दिसुन येत नाही. प्रथम वर्षासाठी पाच कोटी पर्यत कमी होईल परंतु पुढे दरवर्षी भरून निघेल.

मा.उपमहापौर : सुसूत्रीकरणाचा प्रस्ताव स्थायी समितीला पाठविता येतो का ? पाठविला तर कोणत्या नियमानुसार ? सदरिल प्रस्ताव वेगवेगळा का आणला नाही. एकत्रीतरित्या का आणल्या गेला याचा सविस्तर खूलासा करावा.

मा.आयुक्त : कराधान नियमाचे नियम क्र.३५ नुसार आणि जकात दर सुसूत्रीकरण याबाबत दोन्ही सभागृहाचे चांगल्या समन्वयासाठी पाठविण्यात आलेले आहे. सर्वसाधारण सभेच्या निर्णयानंतर शासनास सादर करण्यात येईल. यावर सुचना व हरकती मागविण्यात येतील. त्यानंतर आलेल्या सुचना व हरकतीचा विचार करून पुन्हा आपणाकडे सादर करण्यात येईल.

मा.उपमहापौर : स.सदस्य अ.रशिद खान मामु म्हणतात की, स्थायी समितीचे नांव सोबत घ्यावे. सरळ मार्गी प्रस्ताव ठेवायला पाहिजे होता. जे ठेवण्यात आले ते योग्य वाटत नाही. आपसात भांडणे लागतात.

मा.आयुक्त : प्रशासनाचा कोणताही वेगळा हेतू नव्हता. जकात दर सुसूत्रीकरणाशिवाय खाजगीकरण करू नये असे प्रशासनाचे ठाम मत आहे. नंतर एक वर्ष करता येणार नाही.

श्री.प्रशांत देसरडा : प्रशासन विचार करते मात्र खापर सभागृहावर. दोन प्रस्ताव वेगवेगळे आणले असते एक सुसूत्रीकरणाचा व दुसरा जकात खाजगीकरण. कोणत्या वस्तुवर काय जकात आकारणी करायची. खाजगी उद्दीष्ट कसे ठरविले. २० वर्षापर्यंत कोणी थांबविले होते. ही चुक कोणाची आहे. जकात खाजगीकरण नांदेड व उल्हास नगर येथे बंद झालेले आहे. दोन वेगवेगळ्या विषयी तांदुळ मध्ये तोटा म्हणुन गहूचे दर वाढविले. इतर महानगरपालिकेचे काय दर आहे. शासनाचे काय निकष आहे. शासनाच्या मंजुरीची गरज काय आहे. हे सर्वसाधारण सभेचे अधिकार आहे. धोरणात्मक निर्णय आहे. हा प्रस्ताव सरळ सर्वसाधारण सभेपुढे आणावयास पाहिजे होता. विनंती आहे की, महाराष्ट्रात खाजगीकरण काय झाले आहे. अहमदनगर येथे चार दिवसापासुन बेमुदत बंद आहे.

सौ.रजनी जोशी : १९९९ ला खाजगीकरणाबाबत निर्णय झालेला आहे. हा विषय धोरणात्मक निर्णयाचा आहे व स्थायी समितीकडे का गेले? जर चुक झाली असेल तर प्रशासनाने दिलगिरी व्यक्त करावी.

सौ. लता दलाल : सन २०००-०१, २००१-०२ च्या अर्थसंकल्पामध्ये जकात खाजगीकरणाचा उल्लेख आहे. आता जकातीचे विविध वस्तुंचे दर सुसूत्रीकरणाचा प्रस्ताव आमच्याकडे आहे. वस्तुनिहाय बोलणार नाही. लोकांनी लोकांच्या हितासाठी आम्हाला निवडून दिले आहे. गोरगरीबांवर अन्याय होऊ नये. डोळे झाकून मंजूर करू असे प्रशासनाने समजू नये. डिसेल, पेट्रोल, रॉकेल, गहू यांचे दर वाढवले. आमचे स्पष्ट मत आहे, वाढवलेले दर मंजूर करू नये. ज्या दराने आता वसुली होते तेच दर ठेवावे, दर वाढवू नये आणि कमी देखील करू नये. मोठ्या लोकांचे व कारखानदारांचे हित डोळ्यासमोर ठेवलेले दिसते. सर्व सामान्य जनतेचे हित जोपासण्यात यावे. आहे तेच दर चालु ठेवावे.

श्री. कंवरसिंग बैनाडे : बऱ्याच वेळापासुन जकात सुसूत्रीकरणाबाबत चर्चा चालु आहे. २० वर्षे झाले चिकलठाणा येथे औद्यागिक वसाहत झालेली आहे. आज मोजकेच सात-आठ कारखाने जकात दराचे सुसूत्रीकरण केले नाही तर उद्योग बाहेर जातील. गरवारे कंपनीचे चार युनीट बाहेर वाळुजला गेले आहे. याबाबत विचार करावा. लोकांना रोजगार मिळेल व टॅक्स ही मिळेल. आहे तो टॅक्स बंद होणार. चैनीच्या वस्तुंवरील जकात वाढण्यात यावे. उद्योगाच्या हिताचे आहे.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : सभागृहात चर्चा होत आहे की, प्रस्ताव स्थायी समिती कडे जावा की सर्वसाधारण सभेकडे, स्थायी समिती देखील आपलीच आहे. स्थायी समितीने दर शिफ़ारस करून सर्व साधारण सभेला पाठविले आहे. मुक्या जनावरांना कर लावण्यात येतो. त्यांच्या चाऱ्यांवर कर लावू नये. चारा हा नैसर्गिक आहे. चारा आणणार` गरीब लोक आहेत. जनावरांवर कर लावण्यात येतो, मग माणसांवर का नाही? त्यांच्या खाद्यांची चिंता हे सर्वसामान्यांचे झोपडपट्टीचे असेल. लावू नये. जनावरांचा चारा, भाजीपाला कारखान्याला मिळत असेल तर त्याला लावावा.

दररोज जो येतो त्यावर लावू नये. खाजगीकरणास मान्यता झालेली आहे. त्यामुळे भ्रष्टाचारही कमी होईल.

श्री. मुजीब आलम शहा : महानगरपालिकेने कोणकोणते उद्योग बाहेर जाणार आहेत, त्याबद्दल पत्र दिलेले आहे. हा प्रस्ताव स्थायी समितीला ठेवण्याचा अधिकार आहे. प्रशासनाने विचार करूनच ठेवला आहे.

सौ. विजया रहाटकर : हा विषय मार्गी लावावा. प्रशासन व लोकप्रतिनिधींनी मिळून मार्गी लावावे. प्रस्ताव ठेवले पाहिजे मान्य करावे. जकातीचे सुसूत्रीकरण ऐवढाच विषय महत्वाचा आहे. धान्य, फ़ळ, भाजीपाला यावर जकात दाखवलेले चुक आहे. किंमतीवर जकात आकारणी करावी असे मा. आयुक्त बोलले. दहा रूपये किलो घेतले तर हजार रूपयांवर अर्धा टक्का म्हणजेच पाच रूपये होतात, हे योग्य आहे का? हे चुकीचे आहे. भाजीपाला फ़ळ, धान्य इ. आधाभूत किंमत बदलली की, दर बदलेल. पूर्वी जी जकात होती त्याप्रमाणे आकारणी करण्यात यावी. चैनीच्या वस्तुंवर जकात वाढवावी. सोन्यावर, मोत्यांवर लावण्यात यावी. बांबू, फ़र्निचर वरील कमी करावी. जिथे चैनीचे फ़र्निचर आहे तिथे वाढविण्यात यावे. ज्या वस्तुं सर्वसामान्य जनतेला लागतात त्या वर वाढू नये.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : सदर प्रस्ताव स्थगित करावा व दुरूस्त करून ठेवण्यात यावा. सबसिडी संपली की, जातात. गरवारे हे सबसिडी साठी वाळुज गेले तेथून पैठणला जातील. जेथे शासनाची सवलत मिळते तेथे जातात. २५ टक्के सबसिडी मध्ये कोट्यावधी मिळतात व जमीनही मिळतात. काय सवलत द्यायची त्यावर चर्चा करावी. गरीबांना सवलत मिळावी. एक कमिटी बनवावी. ९९ ला प्रस्ताव झाला त्यावेळेस शहरात अनेक मोर्चे निघाले. नित्य उपयोगातील जेवणाचे ॲटम काढावे व उद्योगधंद्याचे ॲटम सामील करावे. धंदा झाल्यानंतर जकातीच्या स्वरूपात सर्व ग्राहकांकडून वसुली होत असते.

श्री. कंवरसिंग बैनाडे : महाराष्ट्र डिप्लरीज, लुपीन, वखाड यांचे कोट्यावधी उलाढाल आहे. सबसिडी करतात हे चुकीचे आहे. छोटे, मोठे उद्योगधंद्यावाले करत असतील, ८३ कोटी पैसा देखील महानगरपालिकेला पुरत नाही.

मा. महापौर यांनी ३० मिनीटांसाठी सभा तहकूब केली. दुपारी २.४० वा. तहकूब झालेली सभा दुपारी ३.४० वा. पुन्हा सुरू झाली.

श्री. तरविंदरसिंग धिल्लन : जकातीचे सुसूत्रीकरणांमध्ये दर कमी जास्त झालेले आहे. पूर्वी प्रमाणे जसे होते तसेच ठेवावे. खाजगीकरणाबाबत कोणते पत्र आले ते वाचून दाखवावे.

श्री. मुजीब आलमशहा खान : कारखानदार जेवढे होते व जे बाहेर जाणार त्यांनी महानगरपालिकेस कळविले आहे का? त्यांच्याशी काही पत्रव्यवहार किंवा त्यांच्याशी चर्चा झाली का? सभागृहात मागील दोन-तीन तासांपासून चर्चा चालु आहे. दोन वेगवेगळे ठराव यायला हवे होते. खाजगीकरण आणि सुसूत्रीकरण यांच्या एकत्रीत प्रस्ताव आलेला आहे. आज जसे वसुल करतो तेच कायम ठेवण्यात यावे. पुढील वर्षी असा प्रस्ताव आणावा त्यावेळी विचार करावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : जसे दर आहे तसेच राहू द्यावे. दैनंदिन वापराच्या वस्तुंवर वाढविले ते पूर्वीप्रमाणेच ठेवावे. ३.५, २.५ टक्के तेवढेच प्रस्ताव आणावे. जनावरांसाठी आकारणी केलेले रद्द करावे.

श्री. अब्दुल रशीदखान मामु : योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

श्री. डॉ. कराड भागवत : जकातीपासुन ६५ टक्के उत्पन्न मिळते. जकात खाजगीकरण व दरांचे सुसूत्रीकरणाचा संयुक्त प्रस्ताव आलेला आहे. काही कारखाने स्थलांतर होणार

असे झाले तर हजारो नागरीकांचे काम बंद होईल. व कोट्यावधी मिळणारे जकात मिळणार नाही. विचार करण्याची गरज आहे. इंडस्ट्रीजस चे काही पदाधिकारी यांनी भेट घेतली आहे. उत्पन्न वाढवण्याची गरज आहे. चिकलठाणा औद्योगिक वसाहतीतील दहा बारा कंपन्या येथेच रहावे यासाठी प्रयत्न करावे. सबसिडी घेऊन जातात त्यातल्या ह्या कंपन्या नाहीत. वीस पंचवीस वर्षापासून आहे. प्रामुख्याने विचार केल्यास त्या ठिकाणी हजार बाराशे लोक काम करतात. त्या लोकांसाठी दैनंदिन गरजेंचे वस्तू कपडे इ. पासून जकात मिळते. औद्योगिक वसाहतीं संदर्भात जो काही दृष्टीकोन आहे.

मा. आयुक्त : असोसिऐशनला बोलावले होते. त्यांच्याशी चर्चा केली, त्यांची मागणी कमी होईल. कच्चा मालावर एक टक्का लावण्यासाठी त्यांनी सुचना केल्या होत्या. जकातीच्या अडचणी सांगितल्या. भाजीपाला संबंधी सांगितले. किंमतीवर न ठेवता वजनांवर ठेवले तर वारंवार बदल करावे लागेल. खाद्यपदार्थांवर तेवढेच ठेवण्यात आले आहे. प्रत्येक वर्षी जकात दर बदलू शकत नाही. टक्केवारी वर ठेवले तर योग्य राहील. बदलत्या किंमतीवर टक्केवारी प्रमाणे आकारणी होईल.

मा. महापौर : जकात दराचे सुसूत्रीकरण नाही तर खाजगीकरण नाही. जकात दराचे सुसूत्रीकरण केले नाही तर खाजगीकरण करू नये असे प्रशासननाचे मत आहे व उद्योग बाहेर गेल्यानंतर परत येणार नाही. अशी भावना प्रशासनाने व्यक्त केली. आपण जर जकात दराचे सुसूत्रीकरण केले नाही तर ९९ कोटी वर ६ टक्के वाढ होईल.

श्री. संजय शिरसाठ : जकात खाजगीकरण यावर मागील तीन चार तासापासून चर्चा चालू आहे. दोन वेगवेगळे विषय आहे. जकात दराचे सुसूत्रीकरण व खाजगीकरण हे स्थायी समितीच्या प्रस्तावात नमूद केले आहे. जकात खाजगीकरणाला मागे विरोध झाला होता. यात आपल्याला फ़ायदा किती आहे. जकातीत चोरी होते, जवळपास ३८० व्यापाऱ्यांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. ३७ ते ३८ लाखांपर्यंत वसुली करण्यात आली आहे. किती टक्के रक्कम होईल तो भाग वेगळा आहे. ९९-२००१ चे अर्थसंकल्पात २००२ ला मानल. महाराष्ट्र विधानसभा निवडणूका होत्या. सर्व राजकीय पक्षांनी विचार केला विशिष्ट वर्ग दूर जाईल. निवडणूका समोर ठेवून सर्वांनी विरोध केला. ४००० लोकांसाठी १ लाख २५ मतदारांना झळ पोहचू नये. रस्त्यांची दुर्दशा वृत्तपत्रात छापून येते सर्वांना वाटते जकात खाजगीकरण व्हावे. जकातीचे सुमारे १७० कर्मचारी मालमत्ता व पाणीपट्टी वसुलीसाठी वापरता येतील. सध्या मालमत्ता व पाणीपट्टी ची वसुली फ़क्त २०-३० टक्के आहे. उद्योग वाचवले पाहिजे. ८ कोटींचे नुकसान आहे. मा. सर्वोच्च न्यायलायाच्या निर्णयामुळे एका प्रकरणात चुकून वसुल केलेले ५ कोटी आपण परत करत आहोत. खाजगीकरण म्हणून १० टक्के वाढ २ टक्के आस्थापना कर्ज सुमारे २२-२७ टक्के वाढ करतो. उद्योग वाचवण्यासाठी त्या बाजुला पंचतारिका वसाहत देखील भकास वाटते. प्रशासन उद्योगाचे हित जपतात, परंतू सर्व साधारण सभेला भ्रष्टाचारा सारखे आरोप होते, बासमती तांदूळ किती लोक खातात, १५-२० कोटी वाढत असतील, जकात खाजगीकरण ताबडतोब करण्यात यावे, जकातीचे जे विद्यमान दर आहेत ते वाढवू नका आणि कमी देखील करू नका. जकातीच्या निविदा ताबडतोब काढण्यात याव्यात.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : या वर्षी ८३ कोटी पूर्ण करणार. ९९ कोटीचे उद्दिष्ट ठेवणार परंतू, प्रत्यक्षात ६-७ कोटीपेक्षा जास्त येणार नाही. गरीबांचा विचार व्हावा. एकीकडे वाढवता

दुसरीकडे कमी करता. जी वाढ व घट होते तेवढेच ॲटम ठेवून तसे प्रस्ताव ठेवावे. दोन चार ॲटम दुरूस्त करून तेवढ्यापुरतेच आणावे. टेंडर निविदा काढण्यात यावे ते आम्ही थांबवायचे असेल तर आम्ही थांबवू शकतो. त्यापेक्षा दुरूस्त प्रस्ताव दाखल करावे.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : सभागृह नेता यांनी जी सुचना केली निविदा काढून एक वर्षासाठी देण्यात यावी व मध्यांतराच्या काळात ज्या सुधारणा करावयाचा आहेत ते करण्यात यावे.

श्री. कचरू मोरे : कर्मचाऱ्यांना वेठीस धरू नका. जकातीचे संगणकीकरण करा. उद्दिष्ट पूर्ण झाले नाही तर तर खाजगीकरण करावे.

श्री. संजय जगताप : जकात खाजगीकरणास विरोध आहे.

श्री. दिलीप गायकवाड : खाजगीकरण व्हावे २० कोटीचा वार्षिक जास्तीचे मिळतील. प्रयोग म्हणून खाजगीकरण करण्यात यावे.

श्री. हिम्मतराव दाभाडे : प्रशासनातर्फे जर खाजगीकरण झाले नाही तर कारखाने बाहेर जाणार असे भासविले जातात. ज्यांना जायचे असेल त्यांना थांबवू शकत नाही. खाजगीकरण होऊ नये.

श्री. संजय शिरसाट : विरोधी पक्ष नेता व सभागृहात एक मताने निर्णय घेणे चांगले ठरेल. खाजगीकरण व्हावे असे वाटते. स.सदस्य दत्ताभाऊ पाथ्रीकर यांना खाजगीकरण पाहिजे. १० टक्के नैसर्गिक वाढ, १० टक्के खाजगीकरणासाठी वाढ, २ टक्के आस्थापना खर्च, जकात दराचे सुसूत्रीकरण अवलंब केला नाही तर १०५ कोटी पर्यंत जाईल.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : माझे वैयक्तिक मत आहे, पक्षाचे मत नाही. खाजगीकरण व्हावे.

मा.महापौर : सर्व सभागृहाचे मत लक्षात घेता जकात दर सुसूत्रीकरणातंर्गत Rationalization प्रस्तावित फेरबदल नामंजूर करून जकातीचे विद्यमान जकात दर कायम ठेवून व त्यानुसारच खाजगीकरण करणेस मान्यता देण्यांत येते. प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार जकात दराचे सुसूत्रीकरण Rationalization संदर्भात प्रशासनाने प्रस्तावित केलेले आणि स्थायी समितीने शिफारस केलेले दोन्ही प्रस्तावित जकात दर नामंजूर करून, विद्यमान जकात दर विचारात घेवून, जकात कराची वसूली खाजगी अभिकर्त्यामार्फत तातडीने करण्यास मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२३-अ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मार्च २००२ मध्ये ३८ शिक्षण सेवकांना नियुक्ती देण्यात आली होती. शासन निर्णय क्र.पी.आर.ई.२००३/१३३३० (३४७२) प्रा.शि.-१ शालेय शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई -३२. दि.९.४.२००३ अन्वये शिक्षण सेवक कर्मचाऱ्यांची तीन शैक्षणिक वर्ष पूर्ण झाल्यानंतर नियमित वेतन श्रेणीत नियुक्ती देण्याबाबत मार्गदर्शक तत्वे ठरवून देण्यात आलेली आहेत. त्यानुसार सदरील नियुक्त केलेल्या ३८ शिक्षण सेवकांना वेतन श्रेणीमध्ये नियुक्ती देणे आवश्यक आहे. परंतु ९ शिक्षण सेवकांची जात प्रमाणपत्र वैध होऊन अहवाल प्राप्त झालेला नाही. त्यामुळे त्यांना वेतनश्रेणी देणे स्थगित ठेवून खालील दर्शविलेल्या शिक्षण सेवकांना आदेश निर्गमित झाल्याच्या तारखेपासून वेतन श्रेणी रूपये ४५०० ते ७००० ही वेतनश्रेणी देण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

| अ.क्र. | शिक्षण सेवकांचे नांव | प्रथम नेमणूक दिनांक | ३ वर्ष पूर्ण झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | श्री तडवी हुसेन नजीर | १५.३.२००२ | १४.३.२००५ |
| ०२ | श्री घायाळ रामदास आसाराम | १३.३.२००२ | १२.३.२००५ |
| ०३ | श्री बर्डे भरत विष्णू | १५.३.२००२ | १४.३.२००५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ०४ | श्रीमती पवार ज्योतीबाला रामा | १३.३.२००२ | १२.३.२००५ |
| ०५ | श्री कांबळसुनिल कुमार काशीनाथ | ८.३.२००२ | ७.३.२००५ |
| ०६ | श्री सोळूंके भगवान मोतीराम | १४.३.२००२ | १३.३.२००५ |
| ०७ | श्रीमती शेळके शैलजा संभाजी | ९.३.२००२ | ८.३.२००५ |
| ०८ | श्री ताठे तुषार संपत | ८.३.२००२ | ७.३.२००५ |
| ०९ | श्रीमती पाटील अनिता शामराव | ११.३.२००२ | १०.३.२००५ |
| १० | श्रीमती किटे अनिता नामदेवराव | २३.३.२००२ | २२.३.२००५ |
| ११ | श्रीमती श्रेष्ठ रिता गोपीनाथराव | १३.३.२००२ | १२.३.२००५ |
| १२ | श्रीमती निकम मंगल देवराव | १३.३.२००२ | १२.३.२००५ |
| १३ | श्रीमती वैष्णव हेमा राधेश्याम | ९.३.२००२ | ८.३.२००५ |
| १४ | श्री अब्दुल अजीम अ.करीम | १३.३.२००२ | १२.३.२००५ |
| १५ | श्री शेख महमंद अलिम म.आजम | १३.३.२००२ | १२.३.२००५ |
| १६ | श्रीमती मारावार अलका लक्ष्मीनारायण | ९.३.२००२ | ८.३.२००५ |
| १७ | श्रीमती शिंदे मंगल पुंडलीकराव | १३.३.२००२ | १४.३.२००५ |
| १८ | श्रीमती निमगांवकर विजयालक्ष्मी बी. | ७.३.२००२ | १३.३.२००५ |
| १९ | श्री घुले सुदर्शन शिवाजी | १३.३.२००२ | ५.४.२००५ |
| २० | श्रीमती तायडे आम्रपाली त्र्यबंक | ९.३.२००२ | १४.६.२००५ |
| २१ | श्रीमती शिंदे वृषाली माणिकराव | १४.३.२००२ | १८.४.२००५ |
| २२ | श्रीमती पुरी आशा भिमराज | १४.३.२००२ | ७.४.२००५ |
| २३ | श्री झुंजूरडे धनराज सिताराम | १८.३.२००२ | १७.३.२००५ |
| २४ | श्री उबाळे शशीकांत मोहन | १५.३.२००२ | १७.३.२००५ |
| २५ | श्रीमती माळी रोहिण रंगनाथ | ८.३.२००२ | १९.६.२००५ |
| २६ | श्री. राहाणे केदार सोमीनाथ | ८.३.२००२ | ७.३.२००५ |
| २७ | श्री निवालकर गणेश भानुदास | ११.३.२००२ | १०.३.२००५ |
| २८ | श्रीमती रशिदा उन्नीसा अ.युसूफ | ११.३.२००२ | १०.३.२००५ |
| २९ | श्रीमती कुर्ले विजया सुदाम | १३.३.२००२ | १२.३.२००५ |

**संवाद :**

श्री.महेश माळवतकर : सदरील प्रस्ताव शिक्षण समिती मार्फत घेण्यांत यावा.

मा.महापौर : प्रस्तुत प्रस्ताव शिक्षण समितीमार्फत सर्वसाधारण सभेत ठेवण्यांस मान्यता देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव शिक्षण समितीमार्फत सर्वसाधारण सभेत ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

यानंतर ''राष्ट्रगीताने'' सभा संपन्न झाल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.